# परिपत्रक क्र. ०८ सन २०२५

ऊर्जा विभागाच्या अधिपत्याखालील उद्वाहन शाखेतर्फे देण्यात येणाऱ्या उद्वाहनाच्या परवानग्या ऑफलाइन पद्धतीने देण्याबाबतची कार्यपद्धती निश्चित करणेबाबत.

संदर्भ: १. ऊर्जा विभागाची दिनांक २८/०४/२०२५ रोजी ची अधिसूचना.

२.या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्रमांक ७२ /२०२५ दिनांक २९/०४/२०२५.

३.मा. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्याकडे दि. ०२.०५.२०२५ रोजी आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त

४.अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, छ.संभाजीनगर यांचे पत्र क्र. अअछसंन/सअअ/ ३८८/२०२५, दिनांक ०६.०५.२०२५

प्रस्तावना

ऊर्जा विभागाच्या मुख्य विद्युत निरीक्षणालयाच्या अंतर्गत कार्यरत उद्वाहन शाखेद्वारे देण्यात येणाऱ्या उद्वाहन परवानग्यांमध्ये प्रशासकीय सुलभता व गतिमानता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून दिनांक २८/०४/२५ रोजी याबाबतची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. त्याअनुषंगाने महाराष्ट्र उद्वाहन कायदा-१९३९ च्या कलमांच्या अधीन राहून उद्वाहन निरीक्षक व मुख्य विद्युत निरीक्षक मुंबई यांचे ऐवजी उद्वाहन परवानगी देण्याबाबतचे अधिकार हे जिल्हास्तरीय विद्युत निरीक्षक व प्रादेशिक मंडळ अंतर्गत कार्यरत अधीक्षक अभियंता यांना प्रदान करण्यात आले आहे.सद्यस्थितीत सदर परवानग्या या ऑनलाइन पद्धतीने आपले सरकार या संकेतस्थळावरून उद्वाहन निरीक्षक व मुख्य विद्युत निरीक्षक मुंबई यांच्या डिजिटल स्वाक्षरीने देण्यात येत असल्याने यामध्ये बदल करणे गरजेचे ठरत आहे तोपर्यंत अर्जदारांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होऊ नये याकरिता संकेतस्थळात आवश्यक ते बदल होईपर्यंत सदर परवानग्या ह्या ऑफलाइन पद्धतीने देण्याबाबत अतिरिक्त मुख्य सचिव, ऊर्जा विभाग यांनी आदेशीत केले आहे. तरी ऑफलाइन पद्धतीने देण्यात येणाऱ्या परवानग्यांची कार्यपद्धती निश्चित करण्याकरीता अधीक्षक अभियंता प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून समितीमार्फत केलेल्या शिफारशीनुसार काही सूक्ष्म बदलांसह खालीलप्रमाणे कार्यपद्धती (SOP) ठरविण्यात येत आहे.

अ) उद्वाहन उभारणीची परवानगी मिळण्याबाबत

(Permission for Erection Of The Lift)

१. अर्जदाराने विहित नमुन्यात ( नमुना 'A') मध्ये सबंधित विद्युत निरीक्षक कार्यालयास ई-मेल/ हार्ड कॉपी द्वारे अर्ज करावा.

२. अर्जदाराने नमुना 'A' सोबत पुढील प्रमाणे दस्तऐवज दोन प्रतीत (Two Sets) सादर करावेत.

i. उद्वाहन ठेकेदारामार्फत नमुना 'A-१' मध्ये द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

( Declaration in Form "A१" by lift contractor)

ii. विहित नमुन्यातील वास्तूविशारद यांचे प्रमाणपत्र ( Aarchitect Certificate)

iii. विहित नमुन्यातील स्थापत्य क्षमता प्रमाणपत्र ( Structural Stability Certificate)

iv. उद्वाहन ठेकेदाराच्या स्वाक्षरी व शिक्के असलेले उद्वाहन उभारणीचे विस्तृत तांत्रिक नकाशे

( Lift drawing Duly Signed along with stamp of the owner and lift contractor)

v. ईमारत बांधकाम परवानगी ( Building Commencement Certificate)

vi. सक्षम प्राधिकरणाद्वारे ईमारत बांधकामाचे मंजुर नकाशे ( Approved Building Plan by appropriate authority showing Lift shaft and Machine room section Plan)

vii. उद्वाहन ठेकेदाराच्या वैध अनुज्ञप्तीची प्रत(Copy of valid lift Contractor License)

viii. अर्जदाराचे ओळखपत्र (Identity card of the applicant )

३. संबंधित विद्युत निरीक्षकांनी वरीलप्रमाणे प्राप्त दस्तावेजांची तपासणी करून तपासणी सूची (**नमुना** 'A-२') मध्ये याबाबतची आवश्यक ती माहिती भरण्यात यावी. सोबत तपासणी सूची सलग्न करण्यात येत आहे (**नमुना** 'A-२').

४. अर्ज प्राप्त झाल्यानंतर तपासणी दरम्यान काही उणीवा/त्रुटी आढळल्यास अर्जदारास ई-मेलद्वारे अवगत करण्यात यावे.

५. अर्ज तपासणी झाल्यानंतर अर्ज परिपूर्ण असल्याची खातरजमा झाल्यास पुढील मंजुरी करिता विद्युत निरीक्षक यांच्या शिफारसीसह संबंधित अधिक्षक अभियंता यांच्याकडे किमान सात दिवसाच्या मुदतीत प्रस्ताव सादर करण्यात यावा.

६. विद्युत निरीक्षक यांच्याकडून प्राप्त झालेल्या उद्वाहन उभारणीच्या परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर मंडळ स्तरावर आवश्यक ती तपासणी करून विहित नमुन्यात ( **नमुना** 'A-३') मध्ये उद्वाहन उभारणी करिता परवानगी देण्यात यावी .(सोबत **नमुना** 'A-३' संलग्न करण्यात येत आहे.)

७. मंडळ स्तरावर तपासणी अंतर्गत काही उणीवा/ त्रुटी आढळल्यास आवश्यक त्या त्रुटी पूर्तता करण्याकरिता संबंधित विद्युत निरीक्षक यांना कळविण्यात यावे व विद्युत निरीक्षक यांनी सदर

उणिवांची/त्रुटींची पूर्तता करून तातडीने विना विलंब पूर्तता अहवाल मंडळ कार्यालयास सादर करावा. पूर्तता अहवाल प्राप्त झाल्यानंतर अधीक्षक अभियंता यानी सेवा हमी कायदा -२०१५ अंतर्गत ठरवून दिलेल्या विहित मुदतीत उद्वाहन उभारणीची परवानगी विहित नमुन्यात (**नमुना** 'A-३') मध्ये देण्यात यावी .

८. उद्वाहन उभारणी करिता देण्यात आलेली परवानगी ही मंडळ कार्यालयामार्फत अर्जदारास ई-मेल/हार्ड कॉपी द्वारे देण्यात यावी.

९. उद्वाहन उभारणी परवानगी क्रमांकासाठी अनुसरावयाची पद्धती "**परिशिष्ट क**" मध्ये संलग्न करण्यात येत आहे.

ब) उद्वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती मिळण्याबाबत

( License for Working Of the Lift )

१. अर्जदाराने विहित नमुन्यात ( नमुना- 'B' ) मध्ये सबंधित विद्युत निरीक्षक कार्यालयास अर्ज करावा

२. अर्जादाराने नमुना 'B' सोबत पुढील प्रमाणे दस्तऐवज दोन प्रतीत ( Two Sets) सादर करावेत.

  i. संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याकडून उद्वाहन उभारणी करिता देण्यात आलेल्या परवानगीची प्रत (**नमुना** 'A-३')

  ii. उद्वाहन ठेकेदाराचे नमुना 'B-१' मध्ये देण्यात आलेले प्रतिज्ञापत्र प्रतिज्ञापत्र (Declaration in 'Form B-१' by Lift Contractor).

  iii. विहित नमुन्यातील आवश्यक मानकानुसार उद्वाहनांची संयंत्रे बसविण्याबाबतचे विद्युत ठेकेदाराचे प्रतिज्ञापत्र नमुना 'B -२' (Declaration /Certificate of १७ Condition by the Lift Contractor).

  iv. दिनांक ३०/०१/२०१० च्या शासन अधिसूचनेनुसार https://gras.mahakosh.gov.in/ या संकेत स्थळावर "Fees For Inspection of Lift under Lift Act" या लेखा शिर्षावर निरीक्षण शुल्क भरणा केल्याबाबत चलनाची प्रत.(सोबत अधिसूचनेची प्रत संलग्न करण्यात येत आहे.)

  v. अर्जदाराचे ओळख पत्र (Identity of Applicant)

३. शासनांनी निर्गमित केलेय परिपत्रकानुसार उद्वाहन चालवण्याची परवानगी (अनुज्ञप्ती) देताना Automatic Rescue Device (ARD) व लिफ्ट कारमध्ये योग्य ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा बसविणे अनिवार्य आहे. (सोबत शासन परिपत्रक संलग्न करण्यात येत आहे.)

४. अर्जदाराकडून सर्व समावेशक दस्तावेज प्राप्त झाल्यानंतर उभारण्यात आलेल्या उद्वाहनाचे प्रत्यक्ष निरीक्षण सर्व कायद्यांचे/नियमावलीचे व आयएस यांच्या तरतुदीनुसार संबंधित विद्युत निरीक्षक यांनी करावे.

५. निरीक्षणातर्गत विहित नमुन्यात (नमुना 'B-३') निरीक्षण अहवाल विद्युत निरीक्षक यांनी तयार करावा.(सोबत **नमुना** 'B-३' संलग्न करण्यात येत आहे.)

६. निरीक्षणा दरम्यान आढळलेल्या उणिवांची/त्रुटींची पूर्तता करण्यास संबंधित विद्युत ठेकेदार यांना तातडीने अवगत करण्यात यावे. सदर उणिवांची /त्रुटीची पूर्तता केल्यानंतर संपूर्ण निरीक्षण अहवाल विद्युत निरीक्षक यांच्या स्वाक्षरीने विहित नमुन्यासह (नमुना 'B-४') मंडळ कार्यालयास सादर करण्यात यावा.(सोबत **नमुना** 'B-४' संलग्न करण्यात येत आहे.)

७. तद्‌नंतर अधीक्षक अभियंता यांनी विद्युत निरीक्षक यांच्याकडून प्राप्त प्रस्तावावर महाराष्ट्र उद्वाहन कायदा १९३९ व उद्वाहन नियम -१९५८ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचनाच्या अधीन राहून उद्वाहन संच मांडणी सुरक्षित असल्याची खातरजमा करून सेवा हमी कायदा -२०१५ अंतर्गत ठरवून दिलेल्या विहित मुदतीत उद्वाहन चालवण्याची परवानगी विहित नमुन्यात (नमुना 'B -४') मध्ये देण्यात यावी . (सोबत **नमुना** 'B -४' संलग्न करण्यात येत आहे.)

८. उद्वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती ही मंडळ कार्यालयामार्फत अर्जदारास ई-मेल/हार्ड कॉपी द्वारे देण्यात यावी.

९. उद्वाहन चालवण्याची अनुज्ञप्ती क्रमांकासाठी अनुसरावयाची पद्धती "**परिशिष्ट क**" मध्ये संलग्न करण्यात येत आहे.

(संदीप पाटील)
मुख्य विद्युत निरीक्षक,
उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग,
मुंबई

जा.क्र.मुविनि/तांत्रिक/ ७६३ /२०२५
मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांचे कार्यालय
उद्योग, ऊर्जा,कामगार व खनिकर्म विभाग, ३ रा मजला,
प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबुरकर मार्ग,
चेंबुर (पुर्व), मुंबई-४०० ०७१
दुरध्वनी : ०२२-२५२७४६१३
E-mail-ceimumbai.nrg-mh@gov.in
दिनांक : ०७/०५/२०२५

प्रत - मा.अपर मुख्य सचिव (ऊर्जा),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रत - सह सचिव (ऊर्जा-१ ),महाराष्ट्र शासन,उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,मंत्रालय,मुंबई यांना माहितीसाठी सादर.
प्रत : अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ , मुंबई/पुणे/नागपूर/छ.संभाजीनगर यांना माहिती आणि अनुपालनास्तव.
प्रत : सर्व विद्युत निरीक्षक यांना माहिती आणि अनुपालनास्तव.
प्रत : जावक नस्ती/कार्यालयीन नस्ती.